By speedpost

जा.क्र.जिपजा/पंचायत-1/आस्था/काबि/2024/1044
कार्यालय जिल्हा परिषद जालना
दिनांक :- 30 / 09 / 2024

प्रति,

**1) स्वप्नील पंढरीनाथ आघाव,**
305, फाल्गुनी बिल्डींग,
नक्षत्र टाऊनशिप, शेवगाव रहाटगाव रोड,
अमरावती ता.जि.अमरावती.
**(मो.नं.9405105447)**

**2) श्री.प्रविण अण्णासाहेब चित्तेकर,**
रा. तांदुळवाडी खु.ता.जि.जालना
**(मो.नं.9405070444)**

विषय :- सरळसेवा पदभरती सन 2023 - विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या पदाची दिनांक 15/03/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली निवड यादी रद्द करणे बाबत.

संदर्भ :- 1) जिल्हा परिषद जालना मार्फत सरळसेवा पदभरती जाहिरात प्रसिध्द दिनांक 05/08/2023
2) जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद जालना मार्फत प्रसिध्द निवड यादी दिनांक 15/03/2024
3) मा.उपसचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-3124/प्र.क्र.50/आस्था-8 दिनांक 30/04/2024
4) या कार्यालयाचे शासनास मार्गदर्शन मागविलेले पत्र जाक्र.जिपजा/पंचायत-1/आस्था/काबि/563/178/2024 दिनांक 06/06/2024
5) अवर सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-3124/प्र.क्र.141/आस्था-8 दिनांक 12/07/2024
6) मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जिल्हा निवड समिती जालना यांचेकडील बैठक दिनांक 27/08/2024 रोजीचा मान्य कार्यवृत्तांत.

जिल्हा निवड समिती, जालना मार्फत दिनांक 15/03/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या पदाच्या निवड यादी संदर्भात व सदर पदाच्या शैक्षणिक अर्हते संदर्भात निर्णय घेणेसाठी मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जिल्हा निवड समिती जालना यांचे मान्यतेने **दिनांक 27 / 08 / 2024 रोजी** जिल्हा निवड समितीच्या सर्व सदस्यांची बैठक मा.जिल्हाधिकारी, जालना यांचे दालनामध्ये आयोजित करण्यात आलेली होती.

जिल्हा निवड समिती, जालना यांचे मार्फत दिनांक 15/03/2024 रोजी विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या पदासाठी निवड करण्यात आलेल्या 1) स्वप्नील पंढरीनाथ अघाव - प्रवर्ग - भ.ज.ड यांची शैक्षणिक अर्हता ही बी.ई. (मेकॅनिकल इंजिनिअरींग) (गणित विषयासह) आणि 2) प्रविण अण्णासाहेब चित्तेकर - प्रवर्ग - अनु.जाती यांची शैक्षणिक अर्हता बी.ई. (ईलेक्ट्रीकल) (गणित विषयासह) एम.ए. अशी असुन संबधीत उमेदवार यांनी धारण केलेली शैक्षणिक अर्हता ही जालना जिल्हा परिषदे मार्फत दिनांक 05/08/2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हतेशी समकक्ष नसून अर्हता भिन्न आहे.

सबब, विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या पदासाठी दिनांक 15/03/2024 रोजीच्या निवड यादीनुसार निवड करण्यात आलेले वरील नमूद दोन्ही उमेदवार हे सेवा प्रवेश नियमानुसार त्या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्यामुळे व त्यांनी धारण केलेली शैक्षणिक अर्हता ही सरळसेवा भरती जाहिरातीमध्ये व सेवा प्रवेश नियमामध्ये नमूद पदाच्या शैक्षणिक अर्हतेशी समकक्ष नसल्यामुळे जिल्हा निवड समिती, जालना यांचे मार्फत दिनांक 15/03/2024 रोजी 1) स्वप्नील पंढरीनाथ अघाव - प्रवर्ग - भ.ज.ड आणि 2) प्रविण अण्णासाहेब चित्तेकर - प्रवर्ग - अनु.जाती यांची विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या पदासाठी करण्यात

Scanned with OKEN Scanner

आलेली निवड रद्द करण्याचा जिल्हा निवड समिती जालना चे सर्व मा. सदस्य व मा.अध्यक्ष यांनी दिनांक 27/08/2024 रोजीच्या बैठकीमध्ये सर्वानुमते निर्णय घेतलेला आहे.

सबब, जिल्हा परिषद जालना अंतर्गत विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या पदासाठी दिनांक 15/03/2024 रोजीच्या निवड यादीद्वारे करण्यात आलेली आपली निवड रद्द करण्यात येत आहे.

जिल्हा निवड समिती जालना यांचे दिनांक 27/08/2024 रोजीच्या बैठकिचा कार्यवृत्तांत या सोबत आपणास माहितीस्तव पाठविण्यात येत आहे.

**सोबत :-** दिनांक 27/08/2024 रोजीच्या कार्यवृत्तांताची प्रत.

वर्षा मीना (भा.प्र.से.)
सदस्य तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा निवड समिती जालना
जिल्हा परिषद जालना

प्रतिलीपी ----

1) मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जिल्हा निवड समिती जालना यांना माहितीस्तव सविनय सादर.

-sd-
वर्षा मीना (भा.प्र.से.)
सदस्य तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा निवड समिती जालना
जिल्हा परिषद जालना

Scanned with OKEN Scanner